| Publication | Date | Edition | Link | Headline |
|---|---|---|---|---|
| E-SAKAL | 10th April 2022 | Online | तणाव कमी करण्यासाठी ४ दिवसांचा आठवडा; ६० टक्के नागरिकांची पसंती \| Sakal (esakal.com) | तणाव कमी करण्यासाठी ४ दिवसांचा आठवडा; ६० टक्के नागरिकांची पसंती |







देशातील आणि जगातील अनेक कंपन्यांनी ४ दिवसाच्या आठवड्याचा प्रस्ताव कर्मचाऱ्यांसमोर मांडला असून यासाठी कर्मचारी सहमत असल्याचं रिपोर्टमध्ये सांगितलं आहे. कामाचा तणाव कमी करण्यासाठी भारतातील जास्तीत जास्त कर्मचारी यासाठी सहमत आहेत असं एका रिपोर्टमध्ये सांगण्यात आलं आहे.

HR Solutions Genius Consultants च्या रिपोर्टनुसार ६० टक्के कर्मचारी यासाठी सहमत आहेत आणि कामातील समाधान, काम आणि वैयक्तिक जीवनातील समतोल, आणि कामातून होणाऱ्या तणावाला कमी करण्यासाठी ४ दिवसांच्या आठवड्याला कर्मचाऱ्यांनी पसंती दिली आहे. दरम्यान या सर्व्हेमध्ये भाग घेतलेल्या २७ टक्के कर्मचारी म्हणाले की, यामुळे कंपनीच्या कामावर आणि उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. तसेच ११ टक्के कर्मचारी या प्रस्तावासाठी असहमत असल्याचं आढळून आलं. ते म्हणाले की यामुळे कोणतेही साकारात्मक बदल होण्यास मदत होणार नाही त्यामुळे आम्हाला यावर वाद घालण्याची इच्छा नाही.

To read more click on the link